

International Journal of Applied Research

**ISSN Print:** 2394-7500
**ISSN Online:** 2394-5869
**Impact Factor (RJIF):** 8.4
IJAR 2024; 10(4): 102-106
www.allresearchjournal.com
Received: 12-01-2024
Accepted: 18-02-2024

**बापु सुरेश शिवकर**
प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, प्राधिकरण, आकुर्डी, पुणे, महाराष्ट्र, भारत

**Corresponding Author:**
**बापु सुरेश शिवकर**
प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, प्राधिकरण, आकुर्डी, पुणे, महाराष्ट्र, भारत

# प्रधानमंत्री पिक विमा योजनेची प्रगती

**बापु सुरेश शिवकर**

**सारांश**
शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशाच्या GDP मध्ये शेतीचा वाटा केवळ १६ टक्के आहे. तर सुमारे ६० टक्के लोकसंख्या त्यांच्या उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. दुष्काळ, पूर आणि इतर नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे नुकसान भारतीय शेतीला सहन करावे लागते. अलिकडच्या वर्षात कर्जबाजारीपणा, पीक अपयश अलाभकारी किंमती आणि खराब परतावा यामुळे देशाच्या अनेक भागांमध्ये कृषी संकटे निर्माण झाली आहेत. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान असल्यामुळे भारत सरकारने वेळोवेळी शेतीच्या अनिश्चितता दूर करण्याचा प्रयत्न केला. परंतु शेतीची अनिश्चितता दूर झाली नाही. जेणेकरून आज २१ व्या शतकातही शेतकरी सुरक्षित नाहीत. म्हणून कृषी शासनाने क्षेत्राचे महत्त्व ओळखून १३ जानेवारी २०१६ रोजी सरकारने देशातील शेतकऱ्यांच्या हितासाठी व पिक अनिश्चितता दूर करण्यासाठी शेतकऱ्यांना धोकादायक प्रकृतीपासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी प्रधानमंत्री पिक विमा योजना सुरू केली. जे म्हणजे ''एक राष्ट्र एक योजना'' हा वर्तमान पत्र एक वर्णनात्मक शोधनिबंध आहे. जो या योजनेचे विशेष आणि भारतीय शेतकऱ्यांच्या भल्यासाठी होणाऱ्या संभाव्य परिणामांवर प्रकाश टाकतो. तसेच हा पेपर योजनेच्या संकल्पनात्मक चौकटीचा अभ्यास करण्याचा आणि देशातील प्रधानमंत्री पिक विमा योजनेचे फायदे ओळखण्याचा प्रयत्न करतो.

**कूटशब्द :** प्रधानमंत्री पिक विमा योजना, एक राष्ट्र एक योजना, भारतीय अर्थव्यवस्था

**प्रस्तावना**

मानवी विकासाच्या प्रारंभिक अवस्थेपासून शेती मानवाच्या उपजिविकेचे साधन आहे. भारतीय कृषी व्यवसायाची सुरवात इ. स. पूर्व ९०० पासून झाली. तसेच भारतातील शेतीची सुरुवात सिंधु संस्कृतीपासून झाली आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी प्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगार, राष्ट्रीय उत्पन्न, औद्योगिक विकास, वाणिज्य आणि विदेशी व्यापार इत्यादी घटकांचा प्रमुख आधार शेती आहे. भारत हा भौगोलिक स्तरावर ७ वा सर्वांत मोठा देश आहे. लोकसंख्येच्या बाबतीत भारत हा पहिल्या क्रमांकाचा देश आहे. जगातील कृषी क्षेत्रांपैकी भारत हे दुसऱ्या क्रमांकाचे क्षेत्र आहे.

भारताचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ३२८.७३ लाख हेक्टर इतके आहे. त्यापैकी ३०८.३२ लाख हेक्टर जमीन वापरासाठी उपयुक्त आहे. जागतिक कृषी उत्पादनात भारतीय शेतींचा वाटा ७.३९ टक्के इतका आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. सन २०२०-२१ दरम्यान सकल देशांतर्गत उत्पादनात शेतीचा वाटा २० टक्क्यापर्यंत आहे. तसेच भारतातील एकूण रोजगारांपैकी ४१.४९ टक्के रोजगार कृषी क्षेत्रात आहे.

**भारतातील पिक विमा योजनेचा इतिहास :**

जवळपास १०० वर्षापासून पिक विम्याची भारतामध्ये पिक उत्पादनातील जोखीम व्यवस्थापनाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून अनेक मंचावर चर्चा केली जात आहे. भारतामध्ये सर्वप्रथम म्हैसूरचे जे. एस. चक्रवर्ती यांनी १९१२ ते १९२० दरम्यान पावसाच्या निर्देशावर पिकांचे नुकसान भरूनकाढण्यासाठी एक यंत्रणा म्हणून काम केले. त्यांनी १९२० मध्ये पाऊस विमा योजना प्रस्तावित केली. ही योजना ज्या आकडेवारीवर आधारित होती. ती संपूर्ण भारत दृष्टीकोनातून राज्य सरकारच्या संदर्भात आहे. देवास कनिष्ट राज्यात १९४३ मध्ये सक्तीच्या पिक विमा सुरू करण्यात आला. पंजाबमध्ये पिक नुकसान झाल्यावर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी १०० सोसायट्या स्थापन करण्यात आल्या होत्या.

१९४६ मध्ये डॉ. बी. ही. नारायण स्वामी नायडू यांनी मद्रार सरकारच्या सहाय्याने पिक विम्याच्या प्रायोगिक योजनांची शिफारस केली. डॉ. बी. नटराजन मद्रास सरकारच्या आर्थिक सल्लागारांनी राज्यातील सर्व प्रमुख पिकांसाठी पिक विमा योजना तयार केली.

१९५० मध्ये जी. एस. प्रियोळकर यांनी प्रामुख्याने U.S.A. मॉडेलवर आधारित पिक विमा योजना तयार केली. १९५६ मध्ये बँकॉक मध्ये पिक विम्यावरील F.A.O. च्या कार्यरत पक्षाने देखील भारतासाठी पिक विमा कार्यक्रमसुरू कण्याची शिफारस केली. सन १९७२-७८ मध्ये सर्वसाधारण विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे. सन १९७९ मध्ये प्रायोगिक पिक विमा योजना सुरू केली. सन १९८५-१९९९ मध्ये ''सर्वसमावेशक पिक विमा योजनेची'' घोषणा केली. सन १९९९-२००० मध्ये ''बियाणे पिक विम्याची पायलट योजना'' प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात आली. सन २००३-०४ मध्ये ''शेती उत्पन्न विमा योजना'' लागू करण्यात आली. १९९९-२००० मध्ये राष्ट्रीय पिम विमा योजना सुरू केली. वरील सर्व पिक विमा योजनेच्या त्रुटी दूर करून सन २०१६ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आधारित सरकारने ''प्रधानमंत्री पिक विमा योजना'' सुरू केली. ही योजना जगातील सर्वांत मोठ्या पिक विमा योजनांपैकी एक आहे.

### भारतातील शेतकऱ्यांसाठी पिक विम्याची गरज

भारत हे जगातील सर्वांत मोठे आणि वैविध्यपूर्ण कृषी राष्ट्रांपैकी एक आहे. भारतातील शेती हे बहुसंख्य लहान शेतजमीन असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. पाऊस, दुष्काळ, पूर, चक्रीवादळ, गारपीट, कीटक आणि रोगांचे आक्रमण तसेच बनावट बियाणे खते आणि किटक नाशकांची विक्री आणि किंमतीतील घसरण यासारख्या समस्या शेतकऱ्यांच्या नियंत्रणाबाहेरच्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्याकडे वळतात. १९९५ पासून देशभरात ९६४३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरोच्या अहवलात नमून केले आहे. त्यापैकी ६०७५० शेतकऱ्यांनी आत्महत्त्या महाराष्ट्रात आहेत. २००४ मध्ये सर्वाधिक म्हणजेच १८२४१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. सन २०१९ च्या देशात १०२८१ इतक्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण १००००० लोकांपैकी १.४ ते १.८ टक्क्याच्या आसपास आहे. भारतातील एकूण आत्महत्यांपैकी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण ११.२ टक्के आहे. भारत सरकारने शेतकऱ्यांच्या समस्या विचारात घेऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रधानमंत्री पिक विमा योजना सुरू केली. भारतातील संपूर्ण शेती क्षेत्रांपैकी आजही ५५ टक्के क्षेत्र पावसावर अवलंबून आहे. दुसरे म्हणजे भारतातील एकूण शेतकऱ्यांपैकी ८६.२१ टक्के शेतकरी हे अल्प व सीमांत भूधारक (२ हेक्टर पेक्षा कमी जमीन असणारे आहेत.) त्यामुळे वातावरणातील बदलाचा परिणाम सहन करण्याची क्षमता या शेतकऱ्यांमध्ये खूपच कमी आहे. निसर्गाच्या अनिश्चिततेमुळे शेतीच्या उत्पादनामध्ये अनिश्चितता येते. शेतीतील अनिश्चितता आणि जोखमींच्या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या पिक विमा योजनाविकसित करण्यात आल्या आहेत. पिक विमा योजना शेतकऱ्यांना त्यांच्या आर्थिक समस्यांपासून संरक्षण देण्यासाठी उपयुक्त आहे.

### प्रधानमंत्री पिक विमा योजनेची उद्दिष्टये

या योजनेच्या मुख्य उद्दिष्टांचे थोडक्यात वर्णन करणारे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

1. नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगांचा परिणाम म्हणून अधिसूचित पीक अपयशी झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण आणि आर्थिक सहाय्य प्रदान करणे.
2. शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर करणे जेणेकरून ते शेतीत सातत्य राखतील.
3. शेतकऱ्यांना नवीन आणि आधुनिक शेती पद्धती अवलंबण्यास प्रोत्साहित करणे.
4. कृषी क्षेत्रात पतपुरवठा सुनिश्चित करणे.

### प्रधानमंत्री पिक विमा योजनेची वैशिष्ट्ये

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.**

1. **शेतकऱ्यांचे संरक्षण:** या योजनेत शेतकरी क्रेडीट कार्ड इत्यादीद्वारे संस्थात्मक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचा समावेश आहे. आणि कर्जदारांना शेतकरी म्हणतात, जे शेतकरी ऐच्छिक आधारावर विमा संरक्षण मिळवतात, जे बिगर कर्जदार शेतकरी आहेत, त्यांना भाडेकरू आणि भागधारक म्हणतात. कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही योजना सक्तीची आहे.
2. **पिकांची व्याप्ती:** रब्बी आणि खरीप या दोन्ही हंगामासाठी पिकांची माहिती देण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. पिकांचे वर्गीकरण प्रमुख पिके आणि इतर पिकांमध्ये केले जाईल.
3. **प्रीमियम दर:** खरीप पिकांसाठी विमा रकमेच्या २ टक्के आणि रब्बी पिकांसाठी विमा रक्कमेच्या १.५ टक्के एकसमान प्रीमियम निश्चित करण्यात आला आहे. वार्षिक व्यावसायिक आणि बागायती पिकांसाठी प्रीमियमचा दर विमा रक्कमेच्या ५% किंवा विमा दर यापैकी जो कमी असेल तो आहे.
4. **विमा एकक:** योजना क्षेत्र आधारित दृष्टीकोनावर चालते. विमा युनिट हे गाव किंवा ग्रामपंचायत किंवा राज्य सरकारच्या अधिसूचनेत अधिसूचित केलेले समतुल्य युनिट असू शकते.
5. **नवीन तंत्रज्ञानाचा वापर:** योजनेत तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देण्यात आले आहे. शेतकऱ्यांचे दावे निकाली काढण्यात होणारा विलंब कमी करण्यासाठी डेटा कॅप्चर करण्यासाठी आणि अपलोड करण्यासाठी स्मार्ट फोनचा वापर करण्याचा प्रस्ताव आहे. कापणीनंतरच्या प्रयोगांची संख्या कमी करण्यासाठी आरि फील्ड कव्हरेजमधील विसंगती दूर करण्यासाठी रिमोट सेन्सिंग आणि ड्रोनचा वापर केला जाईल
6. **विमा कंपनीसाठी क्लस्टर दृष्टीकोन:** या योजनेअंतर्गत एक क्लस्टर दृष्टीकोन स्विकारला जाईल. ज्यामध्ये स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे तीन वर्षाच्या कालावधीसाठी जिल्ह्यांचा एक गट विमा कंपनीला दिला जाईल.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी केंद्रीय अर्थ संकल्पात निधीचे वाटप २०१६-१७ ते २०२३-२४

| अ. क्र. | आर्थिक वर्ष | निधीचे वाटप (कोटी रु.) | निधी वाटप चढ-उतार (कोटी रु.) |
|---|---|---|---|
| १ | २०१६-१७ | ५५०१ | - |
| २ | २०१७-१८ | ९००० | ३४९९ |
| ३ | २०१८-१९ | १३०१४ | ४०१४ |
| ४ | २०१९-२० | १४००० | ९८६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | २०२०-२१ | १५६९५ | ६९५ |
| ६ | २०२१-२२ | १६००० | ३०५ |
| ७ | २०२२-२३ | १५५०० | -५०० |
| ८ | २०२३-२४ | १३६२५ | -१८७५ |

***Source*:** Various Union Budget for India Allocation of Funds for PMFBY

वरील तक्त्यामध्ये ८ अर्थसंकल्पापासून प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी निधीचे वाटप करण्यात आले. सन २०२१-२२ या अर्थसंकल्पनात प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी सर्वाधिक तरतूद करण्यात आली आहे. २०२१-२२ मध्ये १६००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सन २०१६-१७ पासून ते २०२१-२२ पर्यंत प्रत्येक अर्थसंकल्पात निधी वाटपात वाढ करण्यात आली असल्याचे दिसून येते. सन २०१८-१९ या अर्थसंकल्पनात सर्वाधिक जास्त म्हणजे ४०१४ कोटी रुपये इतकी तरतूदीत वाढ करण्यात आली आहे. सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात ५०० कोटी रुपये इतकी तरतूद कमी करण्यात आली होती. कारण जागतिक कोरोना महामारीमुल देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला होता. म्हणून कल्याणकारी योजनांचा निधी कमी करण्यात आला होता. तसेच सन २०२३-२४ हा अर्थसंकल्पात तब्बल १८७५ कोटी रुपये कमी करण्यात आले होते. सन २०२२-२३ ते २०२३-२४ हे दोन वर्ष सोडले तर प्रत्येक अर्थसंकल्पात निधीची तरतुदीमध्ये वाढ करण्यात आल्याचे दिसून येते.

देशातील प्रधानमंत्री पिक विमा योजनेची वर्षनिहाय प्रगती २०१६-१७ ते २०२१-२२

| अ. क्र. | आर्थिक वर्ष | विमा शेतकरी (लाखात) | विमा क्षेत्र (लाखात) | विमा रक्कम (रु.कोटीत) | शेतकरी हप्ता (रु.कोटीत) | शासन हप्ता (रु.कोटीत | दाखल केलेले दावे (रु.कोटीत) | दिलेले दावे (रु.कोटीत) | लाभाथी शेतकरी (लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१६-१७ | ५८३.७ (१७.२१) | ५६७.३ (२०.१९) | २०३३२० (१८.२२) | ४०४२ (१७.४४) | १७५३१ (१२.५७) | १६७७३ (१६.२२) | १६७५९ (१६.६६) | १५६.४ (१७.२८) |
| २ | २०१७-१८ | ५३३.० (१५.७१) | ५०८.३ (१८.७९) | २०२२६७ (१८.१५) | ४१८९ (१८.०७) | २०४६३ (१४.६८) | २२११८ (२१.४०) | २२११४ (२१.९६) | १७०.४ (१८.३२) |
| ३ | २०१८-१९ | ५७६.९ (१७.०३) | ५२३.० (१९.३४) | २३००६१ (२०.६१) | ४८५३ (२०.९४) | २४५०४ (१७.५८) | २८९४१ (२७.९९) | २८००४ (२७.८१) | २२०.५ (२४.३७) |
| ४ | २०१९-२० | ४२२.० (१२.४४) | ३२८.० (१२.१३) | १४२९५९ (१२.८१) | ३०१८ (१३.०४) | २०५२४ (१४.७१) | २०९७५ (२०.२८) | २००९० (१९.९४) | १८४.९ (२०.४२) |
| ५ | २०२०-२१ | ६१५.९ (१८.१६) | ४४९.८ (१६.६२) | १९७५६० (१७.७) | ४०२१ (१७.३६) | ३१५६१ (२२.६४) | ११४३२ (११.०६) | १०८७५ (१०.७९) | ११३.५ (१२.५४) |
| ६ | २०२१-२२ | ६५९.३ (१९.४०) | ३२८.६ (१२.१४) | १३९६६६ (१२.५१) | ३०४७ (१३.१५) | २४८५२ (१७.८२) | ३१६३ (३.०५) | २८६३ (२.८४) | ५९.४ (६.५७) |
| | एकूण | ३३९०.८ (१००) | २७०५ (१००) | १११५८३३ (१००) | २३१७० (१००) | १३९४३५ (१००) | १०३४०२ (१००) | १००७०५ (१००) | ९०५.१ (१००) |

***Source*:** Department of Agriculture, cooperation and Farmers welfare. टीप: कंसातील आकडे एकूणाशी शेकडा प्रमाण दर्शवितात.

वरील तक्त्यामध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजनेची प्रगती दर्शविली आहे. सन २०१६-१७ ते २०२१-२२ पर्यंत देशातील एकूण ३३९०.८ लाख शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभाग नोंदवला होता. ६ वर्षात योजनेअंतर्गत सहभाग घेतलेल्या ३३९०.८ लाख शेतकऱ्यांनी एकूण २७०५ लाख हेक्टर क्षेत्रावर पिक विमा उतरवला होता. एकूण १११५८३३ कोटी रुपये विमा रक्कम होती. ६ वर्षात योजनेअंतर्गत देशातील सहभाग घेतलेल्या एकूण ३३९०.८ लाख शेतकऱ्यांशी प्रीमियम कंपन्यांकडे २३१७० कोटी रुपये प्रीमियम भरला होता. ६ वर्षात योजनेसाठी केंद्र व राज्यांनी प्रीमियमच्या स्वरुपात ५०:५० टक्केच्या स्वरुपात एकूण १३९४३५ कोटी रुपये दिले होते. प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत देशभरातून १०३४०२ कोटी रुपयाचे दावे दाखल केले होते. ६ वर्षात योजनेअंतर्गत देशातील शेतकऱ्यांना एकूण १००७०५ कोटी रुपये नुकसान भरपाई देण्यात आली होती. १००७०५ कोटी रुपयांची नुकसान भरपाई ही देशातील एकूण ९०५.१ लाख शेतकऱ्यांना दिली आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, देशातील शेतकरी मोठ्या प्रमाणात प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी होत आहे. त्यांना पिक नुकसान झाल्यानंतर नुकसान भरपाईच्या स्वरुपात चांगली अर्थिक मदत होताना दिसून येत आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेची राज्यनिहाय प्रगती २०१६-१७ ते २०२०-२१

| अ. क्र. | राज्य व घटक राज्य | समाविष्ट शेतकऱ्यांची संख्या | विमा क्षेत्र (हेक्टर) | विमा रक्कम (लाख) | शेतकरी हप्ता | केंद्र शासन हिस्सा (लाख) | राज्य शासन हिस्सा (लाख) | एकूण हप्ता | दाखल केलेले दावे | दिलेले दावे | लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आंध्रप्रदेश | ५६३०६४६ | ४०६३५७६ | २८४९४७३ | ४५२५१ | ९७०८८ | १२४१५८ | २६६४९७ | २५९८६४ | २५८४५७ | १६३१०९५ |
| २ | अंद- निको | १८४६ | १३८१ | ५७० | ०३ | १८ | २६ | ४७ | २४ | १५ | ३१४ |
| ३ | आसाम | २५३९८०२ | १५७९७६६ | १११६१६६ | ६५१० | १२६९८ | ३३४३५ | ५२६४४ | २५६४ | ४३७ | १०५५६ |
| ४ | बिहार | ५०१७३२० | ४६०८७८९ | २१७४९१० | ३८३९२ | १०३०४७ | १०३०४७ | २४४४८६ | ७४९३७ | ७४९३७ | ४३४४६२ |
| ५ | छत्तीसगड | १३६८२९७० | ११७६७१०७ | ३९२९४२४ | ७६११८ | १६५९५३ | १६५९५३ | ४०८०२५ | ४७५५०१ | ४७२१२६ | ४६५८७०४ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | गोवा | २६०३ | १३७३ | १४५८ | १७ | ०१ | ०१ | १९ | १४ | १४ | ६५८ |
| ७ | गुजरात | ८३९४८०४ | ११२३३३६१ | ५३८१२१० | १४९९४४ | ५२०४८२ | ५३४१०२ | १२०४५२८ | ५४९१४९ | ५२३२६२ | २५५४९०५ |
| ८ | हरियाणा | ७५१७१३० | १०१८२९६५ | ६५८९६४६ | १२४९५६ | १३२७०४ | १६१०११ | ४१८६७२ | ४२०३६३ | ४१३१३४ | १९३४८२६ |
| ९ | हिमाचल प्र | १००२९९६ | ३५५३१३ | १२१११९ | १८१६ | २६१७ | २६१७ | ७०५० | ५५९७ | ५४५१ | २८८८७६ |
| १० | जम्मु-का | ३१२६६४ | २५९९१८ | १४४१९३ | २५७४ | ४५८४ | ४५८४ | ११७४२ | ३७२० | ३३४६ | ४८०९७ |
| ११ | झारखंड | ४४६०४९१ | १९३९५२३ | १०७३३१७ | ७५१५ | ५१३५२ | ६४८०८ | १२३६७५ | ७८८६६ | १२९२५ | ३०३९०१ |
| १२ | कर्नाटक | ९८५४७३१ | ९८०४५६४ | ३९८८८१३ | ८८४८५ | ३३७१२५ | ३३६७९१ | ७६२४०० | ६४५३२९ | ६३२४४५ | ४५६०८४६ |
| १३ | केरळ | ८८८५३ | ६६६७० | ६०८४९ | १२०२ | १०२४ | १०२४ | ३२५० | ३७१८ | ३६१६ | २५०१८ |
| १४ | मध्यप्रदेश | ३७३१४१५९ | ६०१४०९४९ | २०१४४९२९ | ३६३५८० | १०२७१८८ | १०२७१८८ | २४१७९५५ | २४०५१३४ | २२१५५९६ | ११०९४९५७ |
| १५ | महाराष्ट्र | ६२३१७३३४ | ३४९८१६०९ | ११५९०५०९ | २७८०५२ | ९९११०५ | १०१४१८८ | २२८३३४६ | १५९८११४ | १५७२९८६ | २५५३८९०९ |
| १६ | मणिपूर | २२१८३ | ३११०४ | १०९२८ | १९४ | २५३ | २५३ | ७०० | ३७७ | ३७७ | १५१६४ |
| १७ | मेघालय | ४८२२ | २५७० | २६३७ | ७९ | १० | १० | ९९ | ४४ | ४४ | ९५३ |
| १८ | ओडिसा | २०४४६५६७ | ७२०१३४३ | ४३४३८९३ | ८५८९६ | २५८३८८ | २५८३८८ | ६०२६७२ | ५१५५५५ | ५१३२३४ | ४३८३५१० |
| १९ | पाँडेचेरी | ४०४११ | ३२०६० | १९२९१ | २३ | ५२० | ८०४ | १३४७ | ३१४२ | १४२३ | १४२९५ |
| २० | राजस्थान | ४४६३५५८६ | ४९१७६८२५ | १४९०३६०८ | ३०५८७२ | ८३४०६६ | ८५३४९५ | १९९३४३२ | १६२३३१८ | १६१६२८४ | १२९१३२०९ |
| २१ | सिक्कीम | २३४७ | ५५४ | ४९० | ११ | ० | ० | ११ | १७ | १७ | २९५ |
| २२ | तामिळनाडू | १५०३३७५६ | ६९१६८५८ | ४०८९१८३ | ७३६४८ | ३७९६३८ | ४५८७६९ | ९१२०५५ | ११४४९३३ | १११३८६९ | ८६८०९४५ |
| २३ | तेलंगणा | ३२१२२४१ | २९५४१४६ | २१४१८६७ | ३८८३९ | ४१६०४ | ४१६०४ | १२२०४८ | ७५९०७ | ४१०४४ | ४०७२८५ |
| २४ | त्रिपुरा | २६३१०५ | ४२४९१ | ३३३२१ | १९२ | २१९ | ४४७ | ८५८ | ४७० | ४६९ | ४३९७२ |
| २५ | उत्तरप्रदेश | २७६८७०२९ | २२९५२४२४ | १०५९०५३८ | १९४८२२ | २४०२६० | २४०३६३ | ६७५४४५ | ३०१२४२ | २९८२४८ | ३९४६९८१ |
| २६ | उत्तराखंड | ७४३८४२ | ३९४२२८ | २७०८७९ | ३६७४ | १३३८ | १४६३ | ६४७५ | २६९३ | २६८७ | १२०२६५ |
| २७ | प.बंगाल | १३२९४८९२ | ५४३४०३० | ३७१९२३६ | ३०४८२ | ६३३६८ | ११२७८० | २०६६३० | १२२१७७ | १२१७९४ | २४४७०६४ |
| | एकूण | २८३५२५१३० | २४६१२५४९७ | ९९२९२४५७ | १९१८१४७ | ५२६६६५० | ५५४१३०९ | १२७२६१०६ | १०३१२७६९ | ९८९८२३८ | ८४५९२१६२ |

***Source*:** Agricultural statistics at a glance, 2020-21, page 319.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेची राज्यनिहाय प्रगती दर्शविली आहे. या योजनेअंतर्गत देशातील एकूण २८.३५

कोटी शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी महाराष्ट्रातील सर्वाधिक ६.२३ कोटी शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. त्याखालोखाल राजस्थान ४.४६ कोटी, मध्यप्रदेश ३.७३ कोटी, उत्तर प्रदेश २.७६ कोटी, तमिळनाडू १.५० कोटी आणि पश्चिम बंगाल १.३२ कोटी शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला होता. या योजनेत समाविष्ट शेतकऱ्यांपैकी या ६ राज्यातील शेतकऱ्यांचे प्रमाण ७०.६४ टक्के इतके आहे. तर इतर राज्यातील समाविष्ट शेतकऱ्यांचे प्रमाण केवळ २९.३६ टक्के इतके आहे. या योजनेअंतर्गत समाविष्ट राज्यातील एकूण २४.६१ कोटी हेक्टरवर पिक विमा उतरविला होता. पिक विमा उतरविलेल्या राज्यातील शेती क्षेचिा विचार केला असता महाराष्ट्र, राजस्थान, तमिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश या ६ राज्यातील शेतीक्षेत्राचे प्रमार ७३.१६ टक्के इतके आहे. इतर राज्यातील शेती क्षेत्रावर पिक विमा उतरविण्याचे प्रमाण केवळ २६.८४ टक्के इतके आहे.

या योजनेसाठी एकूण ९९.२९ कोटी रुपये विमा रक्कम होती. प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा एकूण प्रीमियम १२.७२ कोटी रुपये इतका होता. त्यापैकी या योजनेत समाविष्ट असणाऱ्या शेतकऱ्यांनी एकूण १९.१८ लाख प्रीमियम/हप्ता भरला हातो. त्यामध्ये मध्यप्रदेशातील शेतकऱ्यांनी सर्वाधिक ३.६३ लाख रुपये प्रीमियम/हप्ता भरला होता. तर सर्वांत कमी अंदमान आणि निकोबार या केंद्रशासित प्रदेशातील शेतकऱ्यांनी केवळ ०३ लाख रुपये विमा प्रीमियम भरला होता. योजनेच्या एकूण प्रीमियम १२.७२ कोटी रुपयांपैकी केंद्र शासनाचा वाटा ५२.६६ लाख रुपये इतका होता. तर राज्यशासनाचा वाटा ५५.४१ लाख रुपये इतका होता. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी दाखल केलेली एकूण दावे १०३१२७६९ इतके होते. त्यापैकी ९८९८२३८ दावे वाटप करण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत समाविष्ट राज्यातील एकूण ८४५९२१६२ इतक्या शेतकऱ्यांना लाभ मिळाला होता. त्यामध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा लाभ मिळण्यामध्ये प्रथम क्रमांक लागतो. महाराष्ट्रातील २५५३८८०९ इतक्या शेतकऱ्यांना लाभ मिळाला होता. त्या खालोखाल राजस्थान १२९१३२०९, मध्यप्रदेश ११०९४९५७, तमिळनाडू ८६८०९४५, छत्तीसगड ४६५८७०४ आणि कर्नाटक ८६८०९४५ या राज्यातील शेतकऱ्यांचा क्रमांक लागतो. या ६ राज्यातील लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ७९.७३ टक्के होते. इतर राज्याती लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २०.२१ टक्के होते. वरील अभ्यासावरून असे दिसून येते की, या योजनेत समाविष्ट असणाऱ्या प्रत्येक घटकात वाढ दिसून येते. ही योजना काही राज्यात यशस्वीपणे राबवली जात आहे असे दिसून येते.

महाराष्ट्रातील प्रधानमंत्री पिक विमा योजनेची प्रगती २०१६-१७ ते २०२१-२२

| अ.क्र. | वर्ष | समाविष्ट शेतकरी संख्या (लाख) | विमा क्षेत्र हेक्टर (लाख) | विमा संरक्षित रक्कम (कोटी) | विमा हप्ता (कोटी) | लाभार्थी शेतकरी (लाख) | नुकसान भरपाई रक्कम (कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१६-१७ | ११८.०१ (१४.४६) | ७०.८५ (१५.०९) | २१८४३.४३ (१५.६८) | ४०१०.६६ (१४.०३) | २७.८५ (९.०२) | १९१७.९७ (१०.०६) |
| २ | २०१७-१८ | १००.५१ (१२.३२) | ५८.८७ (१४.२९) | १९२३२.५६ (१३.८०) | ३७५२.४४ (१३.१३) | ५२.२८ (१६.९२) | २६८८.८१ (१४.७५) |
| ३ | २०१८-१९ | १४३.७८ (१७.६२) | ८४.८९ (२०.६१) | २६२२९.१३ (१९.०८) | ४९१६.४१ (१७.१९) | ७८.९७ (२५.५८) | ४३०१.५३ (२३.५८) |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २०१९-२० | १४०.८९ (१७.२७) | ७५.१७ (१८.२४) | २५२२९.१३ (१८.१०) | ४९२५.५७ (१७.२२) | ८४.३६ (२७.३१) | ५५११.६८ (३१.२१) |
| ५ | २०२०-२१ | ११९.७३ (१४.६७) | ६५.०४ (१५.७८) | २४५९०.१८ (१७.६४) | ५८०६.१९ (२०.३०) | १६.७४ (५.४२) | १११६.३५ (७.११) |
| ६ | २०२१-२२ | ९६.४६ (११.८२) | ५७.१६ (१३.८७) | २१८८८.५१ (१५.७०) | ५१८७.२१ (१८.१३) | ४८.६६ (१५.७५) | २७०५.०८ (१४.८२) |
| | एकूण | ७१९.३८ (१००) | ४११.९८ (१००) | १३९३७०.३७ (१००) | २८५९८.४८ (१००) | ३०८.८३ (१००) | १८२४१.४२ (१००) |

**संदर्भः** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल, २०१६-१७ ते २०२२-२३. टीप : कंसातील आकडे एकूणाशी शेकडा प्रमाण दर्शवितात.

वरील तक्त्यामध्ये महाराष्ट्रातील प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या कामगिरीचे मूल्यमापन केले आहे. ६ वर्षात प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील एकूण ७१९.३८ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. ७१९.३८ लाख सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी एकूण ४११.९८ लाख हेक्टर क्षेत्रावर पिक विमा भरला होता. ४११.९८ लाख हेक्टरसाठी कूण १३९३७०.३७ कोटी रक्कम विमा संरक्षित म्हणून होती. ६ वर्षात विमा हप्ता एकूण २८५८९८.४८ कोटी रुपये इतका होता. त्यामध्ये सन २०१९-२० या वर्षात सर्वाधिक म्हणजेच ५८०६.१९ कोटी रुपये विमा हप्ता होता. प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत ६ वर्षात राज्यातील एकूण ३८८.०५ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली आहे. ३८८.५ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पोटी २१२४९.०४ कोटी रुपये वाटप करण्यात आले आहे. सन २०१९-२० या वर्षात सर्वाधिक म्हणजेच ५५११.६८ कोटी रुपये नुकसान भरपाई रक्कम वाटप करण्यात आली होती. सन २०२०-२१ या वर्षात सर्वात कमी म्हणजेच १११६.३५ कोटी रुपये वाटप करण्यात आले होते. यावरून असा निष्कर्ष निघतो की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेला चांगला प्रतिसाद दिला आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र हा प्रधानमंत्री पिक विमा योजनेत अग्रेसर आहे असे आढळून आले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने प्रधानमंत्री पिक विमा योजनेची चांगली अंमलबजावणी केली असल्याचे दिसून येते.

**शिफारशी आणि निष्कर्ष**

विविध नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे नुकसान भरून काढण्यासाठी आणि कृषी उत्पादनासाठी निविष्ठांचे वित्तपुरवठा करण्यासाठी प्रभावी पीक विमा योजना अत्यंत महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी पीक विमा महत्त्वाचा आहे. ज्यामुळे अर्थव्यवस्थेच्या बळकटीसाठी कृषी क्षेत्राला चालना मिळेल कमी प्रीमियम दर आणि विमा पिकांचे विस्तृत कव्हरेज असलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा नक्कीच फायदा होईल. पूर्वीच्या योजनांमध्ये पूर्णपणे समाविष्ट नसलेल्या कापणीनंतरच्या नुकसानीचे कव्हरेज देखील प्रदान करते. तुलनात्मक अभ्यास दर्शविते की, पीक विम्याचा क्षेत्रात प्रधानमंत्री फसल विमा योजना ही नि:संशयपणे पूर्वीपेक्षा चांगली योजना आहे. परंतु भारतासारख्या देशामध्ये प्रधानमंत्री फसल विमा याजेनेसारखी योजना आखणे आणि सुरू करणे हा देशातील शेतकऱ्यांच्या कल्याणाचा अंतिम शेवट नाही. योजनेची यशस्वी अंमलबजावणी केल्यावरच त्याचे फळ मिळू शकते. सदोष जमीन वाटप, खराब जमीन अभिलेख आणि भ्रष्टाचार यासारख्या शेतीतील विद्यमान आणि ऐकून न येणाऱ्या समस्या ही दाव्यांची पूर्तता करणे ही काही परिचित आव्हाने आहेत. जी दीर्घकाळापासून अस्तित्वात आहेत. आणि या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीमध्ये अडथळा आणतील. त्यामुळे, सरकारच्या वतीने या योजनेवर कठोर देखरेख आणि पर्यवेक्षण करण्याची गरज आहे. जेणेकरून सर्व प्रदेशातील शेतकरी समुदायाला या योजनेचा लाभ मिळू शकेल.

**संदर्भ**


1. Rao K/N., Kulkarni S.P., Agricultural Insurance Institute of India.
2. Ghosh Ranjan Kumar, Performance Evaluation of Pradhanmantri Fasal Bima Yojana, 2018.
3. HTTP://PMFBYGov.in
4. Various Union Budget for India Allocation of Funds for PMFBY.
5. Department of Agricultural Cooperation and Formers welfare 2021-22.
6. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल, 2016-17 Vo 2021-22.
7. Agricultural statistics at a glance, 2020-21, page 319.
8. www.Maha.Gov.in